नवशक्ति
marathi.freepressjournal.in

## मुंबईत आढळले कोरोनाचे २१३ नवे रुग्ण

**मुंबई** : कोरोनाची तिसरी लाट ओसरली असली तरी कोरोना रुग्णसंख्येचा चढउतार सुरूच आहे. शुक्रवारी दिवसभरात २१३ नवीन रुग्ण आढळल्याने कोरोनाबाधित रुग्णांची संख्या १० लाख ६२ हजार ४७६ वर पोहोचली आहे. तर दिवसभरात शून्य मृत्यूची नोंद झाल्याने मृतांची संख्या १९ हजार ५६६ वर पोहोचली आहे.



थो | ड | क्या | त **महत्त्वाचे**

### घरफोडीच्या तीन गुन्ह्यांत २२ लाखांची लूट

**मुंबई** : घरफोडीच्या तीन गुन्ह्यांत सुमारे २३ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला. घाटकोपर, खार आणि सांताक्रूझ परिसरात या घटना घडल्या असून याप्रकरणी स्थानिक पोलिसांनी तीन स्वतंत्र घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद करुन तपासाला सुरुवात केली आहे. घाटकोपरमध्ये राहणाऱ्या मनीष दत्तात्रय हांडे यांच्या घरात किचनच्या खिडकीतून प्रवेश करून कपाटातील सोन्याचे विविध दागिने, मोबाईल आणि इतर साहित्य असा पावणेआठ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरी केला होता. खार येथे राहणाऱ्या नरेश गोकुळदास रोहिरा यांच्या घरातून १२ लाख ६५ हजार रुपयांचे हिरेजडित दागिने चोरी झाले आहेत. सांताक्रूझ येथील डिंपल अंकित शहा यांच्या घरातून सव्वातीन लाख रुपयांचे दागिने चोरट्यांनी पळवून नेले.

### ऑनलाइन फसवणुकीची रक्कम परत मिळाली

**मुंबई** : ऑनलाइन फसवणुकीची रक्कम काही तासांत परत मिळविण्यात दिंडोशी पोलिसांना यश आले आहे. ३ लाख ६५ हजार रुपयांची कॅश परत मिळाल्याने संबंधित पोलिसांचे वरिष्ठांनी कौतुक केले आहे. गोल्डन हाव्हरमध्ये ही रक्कम परत मिळविण्यात यश आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. मालाड येथे राहणाऱ्या तक्रारदाराने ॲमेझॉनकडून वस्तू मागितली होती. मात्र ती परत करण्यासाठी कस्टमर केअरशी त्यांनी संपर्क साधला. यावेळी बँक डिटेल्सची माहिती दिल्यानंतर त्यांच्या खात्यातून ३ लाख ६५ हजार रुपये ऑनलाईन वळते झाले. त्यांनी लगेचच दिडोंशी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तिथे उपस्थित पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर दिंडोशी पोलिसांनी अवघ्या काही तासातच या प्रकरणाचा छडा लावला.

### मुंबई-गोरखपूरदरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या


**मुंबई** : मध्य रेल्वेद्वारे ६३६ उन्हाळी विशेष गाड्या चालविण्यात येत आहेत. आता उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई आणि गोरखपूर दरम्यान ४ अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये गाडी क्रमांक ०१०५९ उन्हाळी विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस येथून २२ मे आणि २९ मे रोजी रात्री १२.१५ वाजता सुटेल आणि गोरखपूर येथे दुसऱ्या दिवशी १०.१० वाजता पोहचणार आहे. तर गाडी क्रमांक ०१०६० उन्हाळी विशेष गोरखपूर येथून २३ मे आणि ३० मे रोजी १.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.१५ वाजता पोहचणार आहे.

### बोगस अकाउंट उघडून तरुणीची बदनामी

**मुंबई** : सोशल मीडियावर बोगस अकाउंट उघडून एका तरुणीच्या बदनामीचा प्रयत्न झाल्याचा प्रकार मालाड परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी कुरार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे. २८ वर्षांची ही तरुणी मालाडच्या कुरार व्हिलेज परिसरात राहत असून, तिचा महालक्ष्मी इमिटेशनचा व्यवसाय आहे.

# मुंबईत पाणीकपात!

- मंगळवार ते शुक्रवार ४ तास ५ टक्के पाणीकपात
- शहर व उपनगरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम



**प्रतिनिधी/मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पिसे पांजरापूर संकुलातील पांजरापूर येथे १०० किलोव्होल्ट विद्युत उपकेंद्राच्या परिरक्षणाचे काम मंगळवार २४ ते शुक्रवार, २७ मे या कालावधीत दररोज सकाळी ११ वाजेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत एकूण ४ तासांकरिता हाती घेण्यात येणार आहे. या कालावधीत पिसे पांजरापूर संकुल येथून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. त्यामुळे शहर व उपनगरात ५ टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे. कुलाबा, भायखळा, परळ, वडाळा, घाटकोपर, चेंबूर, भांडुप, मुलुंड या भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार असल्याचे जलविभागातील अधिकाऱ्याने सांगितले.

घाटकोपर, भांडुप, मुलुंड, चेंबूर, भायखळा, मस्जिद बंदर, परळ, वडाळा, कुर्ला या भागात ५ टक्के पाणीकपात करण्यात येणार असून या परिसरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या कालावधीत पाणी कपातीपूर्वी अगोदरच्या दिवशी पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवावा. तसेच, कपातीच्या कालावधीत काटकसरीने पाणी वापरून सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

**जलवाहिनी बदलण्याचे काम प्रगतिपथावर!**

मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा विहार तुळशी या सात धरणांतून मुंबईला दररोज ३,८५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो. मुंबईकरांना प्रति एक हजार लिटरसाठी ५ रुपये आकारण्यात येतात; मात्र एक हजार लिटर पाणी शुद्ध करण्यासाठी मुंबई महापालिकेला २४ रुपये खर्च येतो. तरीही मुंबईकरांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी आता जलवाहिनी बदलण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या ब्रिटिशकालीन असून त्या जीर्ण झाल्या आहेत. मुंबईत कमी दाबाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारी येत असतात. मुंबईकरांना पाणीपुरवठा करण्यासाठी ब्रिटिशकालीन जलवाहिन्या बदलण्याचे अथवा दुरुस्तीचे काम हाती घेतल्याचे पालिकेच्या जल विभागातील अधिकाऱ्याने सांगितले. वीज निर्मितीसाठी कोयना धरणातील पाणीसाठ्याचा जास्त वापर होत असल्याने पाणीसाठा कमी झाल्याने चिंता निर्माण झाली होती. मात्र पावसाळा जवळ येत असल्याने मुंबईसह राज्यातील नागरिकांची पाणाचिंता मिटली आहे.

# बेस्टच्या कंत्राटी चालकांचे कामबंद आंदोलन सुरूच

**पीएफ व पगार मिळत नसल्याने आंदोलनावर ठाम**

**प्रतिनिधी/मुंबई**

भाडेतत्त्वावरील बसेस चालवणाऱ्या कंत्राटी चालक व वाहकांना वेळेवर पगार व पीएफचे पैसे मिळत नसल्याने त्यांनी कामबंद आंदोलन पुकारले आहे. मंगळवारपासून सुरू केलेले कामबंद आंदोलन शुक्रवारी कायम असून पीएफ व पगाराचे पैसे मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याचा पवित्रा कंत्राटी चालक व वाहकांनी घेतला आहे.

प्रवाशांचा प्रवास गारेगार व आरामदायी व्हावा, यासाठी बेस्ट उपक्रमाने भाडेतत्त्वावरील बसेस घेतल्या आहेत. जेवढे किलोमीटर बस धावणार, तेवढे पैसे कंत्राटदार कंपनीला देण्याचा करार झाला आहे. तसेच भाडेतत्त्वावरील बसेसवर चालक व वाहक कंत्राटदाराचा आहे. त्यामुळे पगार व पीएफ देण्याबाबत बेस्ट उपक्रमाचा संबंध नाही. कंत्राटी कामगारांना पगार व पीएफचे पैसे देणे ही संबंधित कंपनीची जबाबदारी आहे. मात्र कंत्राटी चालक व वाहकांनी कामबंद आंदोलन केले असून ज्या दिवशी बसेस धावणार नाही, त्या बसेसच्या संख्येनुसार प्रतिबस ५ हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे.



**प्रवाशांची गैरसोय**

बेस्टच्या या पाच आगारातून मंगळवार, १७ मे रोजी १६३ बस सुटल्या नाहीत. त्यानंतर, १८ मे रोजी ३०८, तर गुरुवारी २७५ बसपैकी १९२ बस आगारातून बाहेर पडल्या नाहीत. बेस्टने प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बेस्टच्या ८१ बसेस शुक्रवारी सोडल्याचे बेस्ट प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटखाविक्रीसाठी निरीक्षकानेच मागितली २५ हजारांची लाच

**वार्ताहर / औरंगाबाद**

पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटखाविक्री करण्यासाठी महिन्याला २५ हजारांचा हप्ता देण्याची मागणी करणाऱ्या दौलताबाद पोलीस ठाणाच्या पोलीस निरीक्षक सुनीता मिसाळ यांच्यासह पोलीसनाईक रणजित सुखदेव शिरसाठ यांच्याविरोधात दौलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहिला हप्ता स्वीकारताना पोलीसनाईक शिरसाठला औरंगाबाद लाचलुचपत विभागाने ताब्यात घेतले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दोन महिन्यांपूर्वी दौलताबाद पोलीस ठाण्यात बदली होऊन आलेल्या पोलीस निरीक्षक सुनीता मिसाळ यांच्या पोलीस ठाण्याच्या

**दोघांवर गुन्हा दाखल**

हद्दीत गेल्या काही दिवसांपासून गुटखाविक्री जोरात सुरू होती. पोलीस ठाणे हद्दीत गुटखाविक्री करणाऱ्याला मिसाळ यांनी २४ मार्च रोजी हवालदारामार्फत बोलावणे पाठवले. त्यानंतर गुटखाविक्री करण्यासाठी महिन्याला २५ हजाराचा हप्ता द्यावा लागेल, असे मिसाळ यांनी त्या विक्रेत्याला सांगितले; मात्र तडजोडीअंती १० हजार रुपये देण्याचे ठरले. तसेच पोलीसनाईक शिरसाठ यांनीही वेगळे दोन हजार देण्याची मागणी केली.

त्यानंतर गुटखाविक्रेत्याने थेट औरंगाबाद एसीबीचे कार्यालय गाठत तक्रार दिली. त्यानंतर गुरुवारी दुपारी



१२ वाजता पोलीस ठाण्यातच पैसे देण्याचे ठरले आणि त्यानुसार एसीबीच्या पथकाने सापळा लावला. यावेळी पोलीसनाईक रणजित शिरसाठ याने मिसाळ यांचे १० हजार आणि स्वतःचे दोन हजार रुपये स्वीकारले. एसीबीच्या पथकाने शिरसाठला रंगेहाथ पकडले. शहरातील महत्त्वाचे समजले जाणारे तसेच दौलताबाद पोलीस ठाण्यातील एका पोलीस ठाण्याच्या प्रमुख सुनीता मिसाळ यांच्यावर एसबीची कारवाई झाल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

## भरधाव गाडीच्या धडकेत मुलाचा जागीच मृत्यू

**वार्ताहर / डोंबिवली**

मैदानात खेळताना एका १४ वर्षीय मुलाचा भरधाव गाडीच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास डोंबिवली पूर्वेकडील क्रीडा संकुलात घडली. भरधाव वेगाने गाडी चालविणाऱ्या वाहनचालकास मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. आजच त्याचा वाढदिवस असल्याने सायंकाळी आई-वडिलांनी वाढदिवस साजरा करण्यासाठी तयारी केली होती.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत दिलीप मिश्रा (१४) असे मृत मुलाचे नाव आहे. यात वाहनचालक जयेंद्र रवींद्र नेरलेकर (२५,रा. सदगुरू कृपा आपर्टमेंट, आजदेपाडा, डोंबिवली पूर्व) असे अटक आरोपीचे नाव आहे. डोंबिवली पूर्वेकडील आजदेपाडा येथील साईमाऊली इमारतीत दिलीप मिश्रा राहतात. मिश्रा यांचा मुलगा प्रशांत हा शुक्रवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास प्रशांत डोंबिवली पूर्वेकडील क्रीडा संकुलात क्रिकेट खेळण्यासाठी गेला. या मैदानात जयेंद्रने आपली चारचाकी वाहन भरधाव वेगाने चालवत होता.

## सचिन वाझेचा जामीन अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी / मुंबई**

अंबानींच्या घराबाहेरील स्फोटके आणि मनसुख हिरेन हत्येसह खंडणीप्रकरणी अटकेत असलेला बडतर्फ पोलीस निरीक्षक सचिन वाझेचा जामीन अर्ज शुक्रवारी मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष पीएमएलए न्यायालयाने फेटाळून लावला.



उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबाहेर जिलेटिनच्या कांड्या आणि धमकीचे पत्र ठेवलेली स्कॉर्पिओ गाडी बेवारस सोडण्यात आल्याच्या, तसेच त्या गाडीचा मालक मनसुख हिरेनच्या मृत्यूप्रकरणी गुन्हे शाखेचे सहाय्यक वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वाझे, त्यांचा सहकारी रियाझ काझी आणि पोलीस निरीक्षक सुनील मानेला एनआयएकडून प्रथम अटक करण्यात आली होती. त्यानंतर मनीलॉँड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) वाझेची चौकशी सुरू केली. मनीलॉँड्रिंग प्रकरणात वाझेला जामीन देण्यात यावा, अशी मागणी करणारा अर्ज वाझेकडून विशेष पीएमएलए न्यायालयात दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात ईडीकडून तपास पूर्ण झाला असून, आरोपपत्रही दाखल करण्यात आले आहे.

## जुळा असल्याचा गैरफायदा घेत वहिनीशी शरीरसंबंध

**वार्ताहर/पुणे**

जुळ्या भावांमध्ये साम्य असल्याचा फायदा घेत दिराने वहिनीशी अनेकदा शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याबाबतचा उलगडा झाल्यानंतर त्या विवाहितेने जुळ्या भावांसह सासू-सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना लातूरची असली तरी ही विवाहिता मूळची पुण्याची असल्यामुळे याप्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चौघांविरुद्ध गुन्हा दाखल**

पुण्यातील तरुणीचा विवाह सहा महिन्यांपूर्वी लातूर येथील एका तरुणाशी झाला होता. ज्या तरुणाशी विवाह केला होता, त्याचा एका जुळा भाऊ होता. दोघांमध्ये कमालीचे साम्य होते. याचा गैरफायदा घेत तिच्या पतीचा जुळा भाऊ तिच्याशी शरीरसंबंध प्रस्थापित करत होता. तब्बल सहा महिने दोघे भाऊ या विवाहितेचा उपभोग घेत होते. हा प्रकार लक्षात येताच तिने पतीला याची कल्पना दिली. त्यावर पतीने सुरू आहे, तसेच पुढेही सुरू राहू दे, असा सल्ला दिला. संतापलेल्या विवाहितेने हा प्रकार सासू-सासऱ्यांच्या कानावर घातला. त्यांनीही याकडे दुर्लक्ष करत असेच सुरू राहणार, असे म्हणत तिलाच दम दिला.

काही दिवसापूर्वी ही विवाहिता माहेरी आली असता तिने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली असता चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक नीलकांते अधिक तपास करत आहेत.

## जम्मू-काश्मीरमध्ये बोगद्याचा भाग कोसळला


**वृत्तसंस्था/श्रीनगर**

जम्मू-काश्मीरमधील रामबन आणि रामसूदरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील एका बांधकामाधीन बोगद्याचा काही भाग गुरुवारी रात्री कोसळला. या दुर्घटनेत एक मजूर ठार झाला आहे. याठिकाणी काम करणारे १३ मजूर ढिगाऱ्याखाली अडकले होते. त्यापैकी ३ मजुरांची सुटका करण्यात आली असून अद्याप ९ मजूर ढिगाऱ्याखाली अडकून पडले आहेत. अद्याप बचावकार्य सुरूच असले तरी ९ जणांचे जीव वाचवण्याची शक्यता धूसर बनली आहे.

**एक मजूर ठार**
**नऊ जण अडकले**

गुरुवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गाजवळील रामबन जिल्ह्यातील माकेरकोट भागात खुनी नाल्याजवळ ही दुर्घटना घडली. जिथे हा बोगदा बांधला जात होता. बोगदा कोसळल्यानंतर लगेचच पोलीस आणि लष्कराने संयुक्त बचाव मोहीम सुरू केली. या अपघातात बोगद्यासमोर उभी असलेली वाहने, बुलडोझर, ट्रक यांसह अनेक मशिनचेही नुकसान झाले आहे.

बेपत्ता झालेल्या मजुरांमध्ये ५ पश्चिम बंगालचे, २ नेपाळचे, एक आसाममधील आणि दोन जम्मू-काश्मीरमधील रहिवासी आहेत. यामध्ये जाधव रॉय (२३), गौतम रॉय (२२), सुधीर रॉय (३१), दीपक रॉय (३३), परिमल रॉय (३८) सर्व रा. पश्चिम बंगाल, नवाज चौधरी (२६), कुशी राम (२५) रा. नेपाळ यांचा समावेश आहे. चौहान (२६) आसाम, मुझफ्फर (३८) व इसरत (३०) हे जम्मू-काश्मीरचे रहिवासी आहेत.



## पश्चिम रेल्वेवर फर्स्ट क्लासने प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये वाढ

**प्रतिनिधी/ मुंबई**

सामान्य लोकलमधील फर्स्ट क्लासचे तिकीट दर कमी करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाने घेतला. यानंतर फर्स्ट क्लास मधून प्रवास करणाऱ्या प्रवासी संख्येत वाढ होत आहे. १८ मेपर्यंत दररोज जवळपास ६ हजार ८९५ तिकीट विक्री होत असल्याची माहिती पश्चिम रेल्वेकडून देण्यात आली आहे. यामुळे एसी लोकलसोबत फर्स्ट क्लासच्या तिकीट विक्रीत देखील वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

वाढती मागणी लक्षात घेत ऐन उन्हाळ्याच्या दिवसात रेल्वे प्रशासनाने एसी लोकलच्या तिकीट दरात ५ मे पासून ५० टक्केपर्यंत कपात केली. यापाठोपाठ सामान्य लोकलमधील फर्स्ट क्लासच्या तिकीट दरातही कपात करण्यात आली. हा निर्णय होताच प्रवाशांनी एसी लोकल आणि सामान्य लोकलच्या फर्स्ट क्लासमधून प्रवास करण्यास सर्वाधिक पसंती दिली.

**SBI**
**भारतीय स्टेट बँक**
(भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ अंतर्गत स्थापित)
शेअर्स व बॉंड विभाग, कॉर्पोरेट सेंटर, १४ वा मजला, स्टेट बँक भवन, मादाम कामा रोड, नरिमन पॉईंट, मुंबई -४०००२१
वेबसाईट: https://bank.sbi इमेल: investor.complaints@sbi.co.in
दुरध्वनी क्र.: ०२२-२२७४१४७४, २२७४०८४७, २२७४२४०३, २२७४०८४१, २२७४०८४६, २२७४०८४३

**भागधारकांनी कृपया लक्ष द्यावे:**
**लाभांश प्रदान करणे, कर कपात आणि पुस्तक बंद करण्याची सूचना**

प्रिय भागधारक,

आमच्या आदरणीय भागधारकांना हे कळविण्यास आम्हाला अत्यंत आनंद होत आहे की तुमच्या बँकेच्या केंद्रीय मंडळाने दिनांक १३ मे, २०२२ रोजी पार पडलेल्या त्यांच्या सभेत ३१ मार्च, २०२२ रोजी समाप्त आर्थिक वर्षासाठी रु. १/- दर्शनी मूल्याच्या प्रत्येक समभागासाठी रु. ७.१०/- लाभांश घोषित केला आहे. लाभांश प्रदान करण्यासाठी अभिलेख तारीख २६ मे २०२२ असेल. लाभांश १० जून, २०२२ रोजी प्रदान करण्यात येईल.

२. याद्वारे सूचना देण्यात येते की भारतीय स्टेट बँकेच्या भागधारकांची नोंदवही समभाग हस्तांतरणासाठी, लाभांश प्रदान करण्यासाठी, आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी दिनांक २७.०५.२०२२ (शुक्रवार) ते ३१.०५.२०२२ (मंगळवार) पर्यंत बंद राहील.

३. प्राप्तीकर कायदा, १९६१ (कायदा) नुसार, वित्त अधिनियम २०२० द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, बँकेद्वारे प्रदान किंवा वितरीत लाभांश दिनांक १ एप्रिल २०२० नंतर भागधारकांच्या हातात खालीलप्रमाणे करपात्र आहेत:

I. निवासी भागधारकांसाठी: बँकेद्वारे २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी घोषित व प्रदान केलेल्या लाभांशाच्या रकमेवर प्राप्तीकर कायदा, १९६१ च्या कलम १९४ अंतर्गत १०% दराने उद्गमाच्या ठिकाणी कर कपात केली जाईल, जर भागधारकाने पॅन सादर केले असेल तर. जर पॅन उपलब्ध नसेल तर प्राप्तीकर कायदा, १९६१ च्या कलम २०६एए अंतर्गत २०% दराने उद्गम कर (टीडीएस) कपात केली जाईल.

II. जर आर्थिक वर्ष २०२२-२३ दरम्यान निवासी व्यक्तींना मिळणारा एकूण लाभांश रु. ५००० पेक्षा अधिक नसेल तर त्यांना देय असलेल्या लाभांशावर उद्गम कर कपात केली जाणार नाही. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये तुमच्या बँकेच्या मंडळाने जर काही लाभांश घोषित केला तर अशा भविष्यातील लाभांशाचादेखील यामध्ये समावेश आहे याची कृपया नोंद घ्यावी.

III. प्राप्तीकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार, उद्गम कर (टीडीएस)/ विथहोल्डिंग कर दर हे निवासी व अनिवासी भागधारक तसेच विविध संस्थात्मक भागधारक यांच्यासाठी वेगवेगळे आहेत.

४. जर भागधारकाने फॉर्म १५ जी (कंपनी किंवा संस्था यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला लागू) / फॉर्म १५ एच (६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या व्यक्तींना लागू) सादर केला असल्यास, आणि पात्रतेच्या अटींची पूर्तता होत असल्यास, त्या परिस्थितीत उद्गमाच्या ठिकाणी कर कपात केली जाणार नाही. कृपया फॉर्म १५ जी/ १५ एच/ कर सवलत प्रमाणपत्र पॅनच्या प्रतीसह https://einwardsbi.alankit.com येथे ऑनलाईन सादर करावे.

५. जर निवासी स्थितीमध्ये काही बदल झाले असतील तर प्राप्तीकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार, इमेलद्वारे sbi.div@alankit.com येथे किंवा आमच्या आरटीएला खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पत्र पाठवून दिनांक ३१ मे, २०२२ पूर्वी सूचित करावे.

६. कृपया उचित उद्गम कर / विथहोल्डिंग कर दर निश्चित करण्यासाठी व कापण्यासाठी दिनांक ३१ मे, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी वर नमूद केलेले दस्तऐवज सादर करावेत/ निवासी स्थितीची पुष्टी करावी. ३१ मे, २०२२ नंतर कर निश्चिती/ कपात याविषयीचा कोणताही संपर्क ग्राह्य धरला जाणार नाही. तथापि, जर वर नमूद केलेले तपशील/ दस्तऐवज तुमच्याकडून प्राप्त न झाल्यामुळे उक्त लाभांशावर अधिक दराने कर कपात झाली असल्यास, प्राप्तीचे विवरणपत्र सादर करणे व पात्र असल्यास, योग्य परताव्यासाठी दावा करणे हा पर्याय तुमच्याकडे उपलब्ध राहील.

७. या संधीचा लाभ घेऊन आम्ही आपल्याला ही विनंती करतो की संपर्क सुलभता व अखंड प्रदान व्यवहारांच्या सुनिश्चितीसाठी आपण आपले केवायसी तपशील, इमेल आयडी, पत्ता, मोबाईल क्रमांक व बँक खात्याचे तपशील आपल्या डिपीकडे (डिमॅट स्वरुपात भागधारणा असल्यास), आरटीएकडे (प्रत्यक्ष स्वरुपात भागधारणा असल्यास) अद्ययावत करावेत.

८. प्रत्यक्ष स्वरूपातील समभागधारकांना त्यांचे समभाग तात्काळ डिमॅट करण्याची विनंती आहे, तुमचे समभाग डिमॅट स्वरुपात रूपांतरित करण्यासाठी तुमचे रु. १ दर्शनी मूल्याचे एसबीआय भाग प्रमाणपत्र तुमच्या डिपीकडे सादर करावीत. जर तुमच्याकडे डिमॅट खाते नसेल तर तुम्ही अर्ज आणि अधिकृतरित्या वैध असलेले केवायसी (नो युअर कस्टमर/ तुमच्या ग्राहकाविषयी जाणून घ्या) दस्तऐवज म्हणजेच (ए) पॅन (बी) आधार कार्ड (सी) पारपत्र (डी) मतदान ओळखपत्र (ई) वाहन चालक परवाना (एफ) रद्द केलेला धनादेश इत्यादि सादर करून कोणत्याही डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे (डिपी) तुमचे डिमॅट खाते उघडू शकता.

९. वरील लाभांश प्रदानाविषयी काही शंका असल्यास, कृपया sbi.div@alankit.com येथे इमेल करा किंवा आमच्या आरटीएला खालील पत्त्यावर पत्र पाठवा:

युनिट: भारतीय स्टेट बँक, मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड,
२०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५.
दूरध्वनी क्रमांक: ७२९००७१३३५

काही शंका/तक्रारी असल्यास आपण investor.complaints@sbi.co.in येथे इमेलद्वारे कळवू शकता.

आपला बहुमूल्य पाठिंबा व सहकार्याबद्दल आपले आभार.

**भारतीय स्टेट बँक करिता**

स्थळ: मुंबई
दिनांक: १९.०५.२०२२

शाम के
सहाय्यक महाप्रबंधक
(अनुपालन व कंपनी सचिव)

**१ जूनपासून कार्यान्वित; योगासाठी ३० जणांच्या ग्रुपला प्राधान्य**

# मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी शिव योगा सेंटर

**प्रतिनिधी / मुंबई**

मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी आता शिव योगा सेंटर सुरू करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. १ जूनपासून सुरू होणाऱ्या शिव योगा सेंटरच्या माध्यमातून मुंबईकरांना योगाचे धडे देण्यात येणार आहेत. योगाचे धडे घेण्यासाठी किमान ३० जणांचा ग्रुप गरजेचा असून तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून योगाचे धडे दिले जाणार असल्याचे पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजीवकुमार यांनी सांगितले. दरम्यान, योगाचे धडे देणाऱ्या एका प्रशिक्षकाला दोन तासांचे एक हजार रुपये मानधन देण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

वातावरणात होणारे बदल यामुळे मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. मुंबईकरांच्या सुदृढ आरोग्यासाठी



शिव योगा सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. एखाद्या व्यक्तीला काही आजार झाल्यानंतर त्या आजारावर मात केल्यानंतर आरोग्य उत्तम राहावे यासाठी योगा हा उत्तम पर्याय आहे. या पार्श्वभूमीवर पालिकेने सर्वसामान्यांसह वृद्ध, सहव्याधी असणारे आणि तरुणांमध्येही योगाची जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. ही योगा केंद्रे सार्वजनिक सभागृहे, पालिका किंवा खासगी शाळा, मंगल कार्यालये, पालिकेच्या जागा, सार्वजनिक ठिकाणी चालविण्यात येतील. शिव योगा सेंटर सुरू करण्यासाठी योग्य ती प्रक्रिया सुरू असून निविदा प्रक्रिया राबवण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

**खासगी सोसायट्यांत योगा सेंटर**

मुंबईत अनेक सोसायट्या असून सोसायटीत जागा उपलब्ध असल्यास त्या ठिकाणी योगाचे धडे दिले जाणार आहेत. या उपक्रमासाठी पालिकेकडून तज्ज्ञ संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षकांची निवड करण्यात येत आहे. या उपक्रमासाठी संस्थेची निवड अंतिम करताना आयुष मंत्रालयाचा सल्लाही घेतला जाणार आहे.

**अर्थसंकल्पात २५ कोटींची तरतूद**

- मुंबईत एकूण २०० 'शिव योगा' केंद्रे सुरू केली जाणार आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यात १०० केंद्रे सुरू करण्यात येतील. या आर्थिक वर्षासाठी २५ कोटींची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

**२०० केंद्र सुरू करणार!**

'शिव योगा' केंद्रांवर प्रत्यक्ष सूचना देणे आणि लक्ष ठेवण्यासाठी प्रशिक्षकांचे पॅनल तयार करण्यात येणार आहे. मुंबईत एकूण २०० 'शिव योगा' केंद्रे सुरू केली जाणार आहेत.

epaper.freepressjournal.in